# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.७१ दिनांक २४/०७/२०२१

# बोईसर पोलीस ठाणे यांचेकडुन जुगार खेळाणा-या ०६ आरोपीतांवर कारवाई

दिनांक २४/०७/२०२१ रोजी १८.१० वा.चे सुमारास बोईसर पोलीस ठाणे हद्दीत बोईसर (पुर्व) थावरपाडा यादवनगर येथील गढवी यांचे तबेल्याचे बाजुला टेम्परारी शेड येथे बोईसर ता.जि.पालघर येथे काही इसम जुगार खेळत असल्याची गुप्त बातमी मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर ठिकाणी छापा टाकला असता यातील आरोपीत क्र.०१ ते ०६ हे टेम्परारी शेडमध्ये बेकायदेशिरपणे पैशांवर तीन पत्ती जुगार खेळत असतांना मिळुन आले.

सदर आरोपीत यांचे ताब्यातुन १) ७,९००/- रु.रोख रक्कम आरोपी क्र.१ याचे पुढयात मिळून आलेले २) २१,००/- रुपये रोख रक्कम आरोपी क्र.२ याचे पुढयात मिळून आलेले. ३) २७,००/- रुपये रोख रक्कम आरोपी क्र. ३ याचे पुढयात मिळून आलेले. ४) १२,७०/- रुपये रोख रक्कम आरोपी क्र.४ यांचे पुढयात मिळून आलेले. ५) ३६,८०/- रोख रक्कम आरोपी क्र. ५ याचे पुढयात मिळून आलेले. ६) २१,००/- रुपये रोख रक्कम आरोपी क्र.६ याचे पुढयात मिळून आलेले. ७) २३,००/- रुपये रोख रक्कम त्यात भारतीय चलनातील ५००/- रुपये दराच्या ३ नोटा, २००/- रुपये दराच्या ३ नोटा, १००/- रुपये दराच्या २ नोटा, ८) ००.०० /- रुपये एक पत्त्याचा कॅट त्यात पत्त्याची एकूण ५२ पाने असलेली असा एकुण २२०५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत याचे विरुध्द बोईसर पोलीस ठाणे गु.र.नं.।।२२१/२०२१ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२ (अ) प्रमाणे, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोहवा/मोतीराम शिंदे, हे करित आहेत.

सदरची कारवाई पोनि/सुरेश कदम, प्रभारी अधिकारी, बोईसर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली बोईसर पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी केली आहे.